# SPV GLOBAL TRADING LIMITED

(Formerly Known as Tarrif Cine & Finance Limited)

CIN: L27100MH1985PLC035268

Regd. Off. : Ground Floor, Binani Bhavan 28/30, Anant Wadi, Bhuleshwar Mumbai - 400 002.

• Tel : 2201 4001 • Fax: 2201 4003 • Email Id : spvglobaltrading@gmail.com, BSE CODE NO. 512221.

Website : www.spvglobal.in


To

**BSE Limited**

Phiroze Jeejeebhoy Towers,

Dalal Street, Fort,

Mumbai- 400001

**BSE Scrip Code: 512221**

**Sub: Intimation under Regulation 47(3) of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015.**

Pursuant to Regulation 47(3) read with Regulation 30 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed newspaper cutting of Public Notice published in the Newspapers viz. — Financial Express (in English) and VritManas (in Marathi) on 22nd November 2024, in compliance with the Ministry of Corporate Affairs Circular dated 05th May, 2020, 13th January, 2021 and 05th May, 2022 intimating that the Extra Ordinary General Meeting (EGM) of our Company scheduled to be held on Wednesday, 18th December 2024 at 04:00 p.m. (IST) will be held through physical mode.

Kindly take the same on record.

Thanking you,

**For SPV GLOBAL TRADING LIMITED**

Vishwas Vasant Patkar

Digitally signed by Vishwas Vasant Patkar
Date: 2024.11.22 17:40:48 +05'30'

**Vishwas Patkar**

**(Chief Financial Officer)**

**Date: 22nd November 2024**

**Place: Mumbai**

## निवडणूक कर्तव्यावर असताना पालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू

**मुंबई :** निवडणूक कर्तव्यावर असताना पालिकेच्या एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. हा कर्मचारी अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात कर्तव्यावर होता. आदल्या दिवशी मतदान केंद्रात दाखल झाल्यानंतर त्याला अस्वस्थ वाटू लागले. उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. वांद्रे, सांताक्रूझचा भाग असलेल्या एच पश्चिम विभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचारी अनिल सातपुते यांना निवडणुकीसाठी अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात जबाबदारी देण्यात आली होती. मतदानाच्या आदल्या दिवशी अंधेरी पूर्व येथील सर्वपल्ली राधाकृष्णन शाळेत त्यांना मतदान केंद्रावर बोलावण्यात आले होते. मतदान केंद्रावर असतानाच त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यावेळी त्यांना जोगेश्वरीच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू नक्की कशामुळे झाला याबाबतचा वैद्यकीय अहवाल अद्याप आलेला नाही.



# मतमोजणीसाठी प्रशासनाकडून चोख नियोजन आणि बंदोबस्त

### मुंबई शहर जिल्ह्यात ५२. ६५ तर, मुंबई उपनगर जिल्ह्यात ५६.३९ टक्के मतदान

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्ह्यात मतदान सुरळीतपणे पार पडल्यानंतर आता मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून चोख नियोजन करण्यात आले असून प्रत्येक मतमोजणी केंद्रांवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्ह्यातील मिळून एकूण ३६ मतदारसंघांसाठी ३६ केंद्रांवर शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी होईल. प्रत्यक्ष मतमोजणी करण्यासाठी सुमारे २ हजार ७०० हून अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तर, सुमारे १० हजार पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत.

भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशांनुसार, प्रथमच मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हा निवडणूक अधिकारीपदाची संयुक्तपणे जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनात आणि अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई शहर), संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर यांच्या देखरेखीखाली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ अंतर्गत मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यातील एकूण ३६ मतदारसंघांसाठी विधानसभा मतदारसंघांमध्ये दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली.

मुंबई शहर जिल्ह्यात एकूण ५२.६५ टक्के मतदान नोंदवले गेले आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील एकूण १० मतदारसंघात मिळून एकूण २५ लाख ४३ हजार ६१० मतदार आहेत. यापैकी एकूण १३ लाख ३९ हजार २९९ नागरिकांनी मतदान केले. त्यामध्ये वर्गीकरण लक्षात घेता, १३ लाख ६५ हजार ९०४ पुरुषांपैकी ७ लाख १० हजार १७४ पुरुष मतदारांनी मतदान केले. तर, एकूण ११ लाख ७७ हजार ४६२ महिलांपैकी ६ लाख २९ हजार ०४९ महिलांनी मतदान केले. इतर २४४ मतदारांपैकी ७६ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

प्रारंभी, टपाली मतदानांची मतमोजणी होईल आणि त्यानंतर ईव्हीएममधील मतदानाची गणना केली जाईल. प्रत्यक्ष मतमोजणी करण्यासाठी प्रत्येक मतदारसंघानुसार, निवडणूक निर्णय अधिकारी, पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक, सूक्ष्म निरीक्षक, सहायक कर्मचारी आदी मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, मतमोजणी प्रक्रियेदरम्यान सुरक्षेसाठी पोलिस दलासोबत अन्य यंत्रणांचेही मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत. मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील ३६ मतदारसंघांच्या एकूण ३६ मतमोजणी केंद्रांवर मिळून सुमारे २ हजार ७०० हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा दलाचे मिळून एकूण १० हजार पोलिस अधिकारी, कर्मचारी मतमोजणी केंद्रांवर तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान, मतमोजणी प्रक्रियेत सहभागी कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष मतमोजणी पारदर्शकपणे आणि सुलभरित्या व्हावी, या अनुषंगाने मतमोजणी प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दोनवेळा प्रशिक्षण देण्यात येत आहे. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी यासाठी पहिल्यांदाचा प्रशिक्षण देण्यात आले. तर, आज शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०२४ रोजी पुन्हा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईसह महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ 21 नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृतिदिन म्हणून शासकीय पातळीवरती पाळण्यात येतो.काल यानिमित्त संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे ऐतिहासिक व प्रेरणास्थान असलेल्या हुतात्मा स्मारक या स्थळास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त भूषण गगराणी मुंबई शहराचे जिल्हाधिकारी संजय यादव संयुक्त महाराष्ट्र स्मृति मंडळाचे अध्यक्ष महादेव गोविंद तथा भाऊ सावंत मुंबईचे पोलीस आयुक्त आदी मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले

संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे अभ्यासक भाऊ सावंत यांच्या पाठपुराव्यामुळे 21 नोव्हेंबर 2000 या वर्षापासून महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृतिदिन पाळण्यात येतो.



# मुंबई शहर भागातील दहा मतदारसंघात 52.69 टक्के मतदान

### पुरुषांपेक्षा महिला मतदारांचे प्रमाण काकणभर सरस

■ मुंबई

मुंबई शहर जिल्ह्यात विधानसभेच्या दहा मतदारसंघांसाठी सरासरी ५२.६९ टक्के मतदान झाले आहे. सर्वाधिक ५९.०१ टक्के मतदान माहिममध्ये तर, सर्वात कमी ४४.४४ टक्के मतदान कुलाबामध्ये झाले आहे.विशेष म्हणजे या दहा मतदारसंघात पुरुष मतदारांच्या तुलनेत महिलांचे सरासरी मतदानाचे प्रमाण काकणभर सरस म्हणजे १.४३ टक्क्यांनी जास्त झाले आहे. या दहा मतदारसंघात एकूण पुरुष मतदारांपैकी सरासरी ५१.९९ टक्के पुरुषांनी तर, एकूण महिला मतदारांपैकी ५३.४२ टक्के महिलांनी मतदान केले.



| मतदार संघ | टक्केवारी |
|---|---|
| धारावी | ५०.०३ |
| सायन कोळीवाडा | ५३.५६ |
| वडाळा | ५७.६७ |
| माहीम | ५९.०१ |
| वरळी | ५३.५३ |
| शिवडी | ५५.५२ |
| भायखळा | ५३.०२ |
| मलबार हिल | ५२.५३ |
| मुंबादेवी | ४८.७६ |
| कुलाबा | ४४.४४ |

मुंबई शहर जिल्ह्यात धारावी, सायन कोळीवाडा, वडाळा, माहीम, वरळी, शिवडी, भायखळा, मलबार हिल, मुंबादेवी आणि कुलाबा या दहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या दहा मतदारसंघांमध्ये एकूण २५ लाख ४१ हजार ८१० मतदार आहेत. त्यापैकी १३ लाख ६५ हजार ९०४ पुरुष तर, ११ लाख ७७ हजार ४६२ महिला आहेत. यापैकी सात लाख १० हजार १७४ पुरुषांनी आणि सहा लाख २९ हजार ४९ महिलांनी मतदान केले. येथील महिला मतदारांच्या एकूण संख्येच्या तुलनेत ५३.४२ टक्के महिलांनी तर, पुरुष मतदारांच्या एकूण संख्येच्या तुलनेत ५१.९९ टक्के पुरुषांनी मतदान केले. या दहा मतदारसंघांमध्ये तृतीयपंथी मतदारांची संख्या २४४ आहे. त्यापैकी ७६ जणांनी म्हणजेच ३१.१५ टक्के जणांनी मतदान केले.

# कार्तिकी एकादशीसाठी 1 लाखांहून अधिक भाविकांच्या गर्दीचे नियोजन

### मध्य रेल्वेने विशेष गाड्या सोडल्याने सुलभ प्रवास

प्रतिनिधी
■ मुंबई

कार्तिकी एकादशी हा एक महत्त्वाचा सण आहे ज्यामध्ये लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील पंढरपूर येथे येतात. यंदा कार्तिकी एकादशीच्या जत्रेसाठी विविध ठिकाणांहून पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. मध्य रेल्वेने कार्तिकी एकादशी मेळा-२०२४ च्या यशस्वी व्यवस्थापनात प्रभावी भूमिका बजावली आहे, ज्यामध्ये १० ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पंढरपूरला भेट देणाऱ्या १ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत.

विभागाने या कालावधीत पंढरपूर स्थानकावर ५७ विशेष गाड्यांव्यतिरिक्त ९८ नियमित गाड्यांचे सुरळीत संचालन सुनिश्चित केले. स्थानकावर एकूण १.०९ लाख प्रवाशांची वर्दळ नोंदवण्यात आली. मध्य रेल्वेने दर्शनासाठी येणाऱ्या लाखो प्रवाशांना सुरळीत, सुरक्षित प्रवास आणि रेल्वे परिसरात आरामदायी मुक्काम मिळावा यासाठी जोरदार प्रयत्न केले आहेत.



**प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वेची विशेष व्यवस्था**

*हेल्प डेस्क: "मी तुम्हाला मदत करू शकतो का" या बूथवर हिंदी, मराठी, कन्नड आणि इंग्रजीमध्ये मार्गदर्शन करण्यात आले.*

*तिकीट: ७ सामान्य तिकीट खिडक्या, १ आरक्षण खिडकी (दोन शिफ्टमध्ये चालवल्या गेल्या) आणि ४ स्वयंचलित तिकीट वेंडिंग मशिन्स (ATVM) यांनी त्रासमुक्त तिकीट विक्री सुनिश्चित केली.*

*निवारा: गर्दीला सामावून घेण्यासाठी दोन जलरोधक निवारे उभारण्यात आले.*

*वैद्यकीय सेवांचा विस्तार: स्टेशनवर २ डॉक्टर, २ नर्स, २ फार्मासिस्ट आणि ४ सपोर्ट स्टाफसह २४x७ वैद्यकीय मदत डेस्क उभारण्यात आला होता. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी एक रुग्णवाहिका चोवीस तास तैनात करण्यात आली होती.. स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थापन करण्यात आले होते.*

**शौचालय सुविधां**

*प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर १० शौचालये (अपंगांसाठी २), सामान्य प्रतीक्षालयात ८ शौचालये, फिरत्या भागात २० फिरती शौचालये, सुलभ शौचालयांच्या समन्वयाने ६० शौचालये आणि १८ स्नानगृहांची व्यवस्था, सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ६० आरपीएफ आणि जीआरपी कर्मचारी तैनात. गर्दीचे निरीक्षण आणि व्यवस्थापनासाठी २० सीसीटीव्ही कॅमेरे बसवले.*

# दहावी-बारावी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. 11 फेब्रुवारी ते 18 मार्च 2025 या कालावधीत बारावीची परीक्षा पार पडणार आहे. तर दहावीच्या परीक्षेसाठी 21 फेब्रुवारी ते 17 मार्च 2025 हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय शिक्षण मंडळांतर्गत दहावी-बारावीची अंतिम परीक्षा घेण्यात येते. विद्यार्थ्यांना अभ्यासाचे आगाऊ नियोजन करता यावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून जुलै किंवा ऑगस्टमध्येच दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे. त्यानुसार यंदा ऑगस्ट महिन्यात दहावी-बारावी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले. तसेच वेळापत्रका संदर्भात काही हरकती सूचना असतील तर त्या 23 ऑगस्टपर्यंत राज्य मंडळाने मागविल्या होत्या.



***CBSE ची परीक्षा 15 फेब्रुवारीपासून***

*केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) 10 वी आणि 12 वी बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. 10 वी आणि 12 वीच्या परीक्षा 15 फेब्रुवारीपासून सुरु होणार आहेत. दहावी बोर्डाची परीक्षा 18 मार्चला संपणार आहेत. तर बारावीची परीक्षा 4 एप्रिलपर्यंत सुरु असेल. सीबीएसईने परीक्षेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यासह शाळांना परीक्षेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी बोर्डाकडे सोपवण्यात सांगण्यात आलं आहे*

बारावीच्या परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आणि दहावीच्या परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केल्या जातात. संबंधित परीक्षांचा ऑनलाईन निकाल मे अखेरीस आणि जूनच्या पहिल्या आठवडयात जाहीर करण्यात येतो. त्यानंतर अनुत्तीर्ण तसेच श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्टची पुरवणी परीक्षा साधारणत जुलैच्या तिसऱ्या आठवडयापासून घेतली जाते.

विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया वेळेवर होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा या मंडळाच्या परीक्षेनंतर आयोजित केल्या जात असल्याने अशा परीक्षांचा अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेवून त्याचा निकाल लवकर जाहीर करणे या बाबींचा सारासार विचार करता सन 2025 ची फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावी-बारावीची परीक्षा नेहमीपेक्षा 8 ते 10 दिवस आधी आयोजित करण्याचा मंडळाचा मानस असून त्याअनुषंगाने लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# मतमोजणीच्या ठिकाणापासून 300 मीटरपर्यंत गर्दी करण्यास बंदी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील 36 विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी होणार आहे. मतमोजणी केंद्रांवर मोठ्या संख्येने लोक जमण्याची शक्यता लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी मतमोजणी केंद्रापासून ३०० मीटरपर्यंत गर्दी जमण्यास बंदी घातली आहे. मुंबईचे पोलिस उपायुक्त आणि प्रवक्ते अकबर पठाण यांनी हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशात म्हटले आहे की, मतमोजणीवेळी मोठ्या संख्येने लोक मतमोजणी केंद्रावर येण्याची शक्यता आहे. 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणीची प्रक्रिया सुरू होणार आहे. सार्वजनिक शांततेचा भंग रोखण्याच्या उद्देशाने व्यक्तींच्या एकत्र येण्यास मनाई आहे ज्यामुळे उपद्रव किंवा दुखापत किंवा अडथळा, उपद्रव किंवा कायदेशीररित्या काम केलेल्या व्यक्तींना इजा होण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि विशेष अधिकार प्राप्त कार्यकारी दंडाधिकारी सुरक्षा संहिता, 2023 भारतीय नागरी संहितेच्या कलम 163 आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 अंतर्गत कलम 10 अन्वये, निवडणूक अधिकारी किंवा कोणत्याही सार्वजनिक कामात गुंतलेली कोणतीही व्यक्ती, 21 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 06.00 ते 24 नोव्हेंबर 2024 रोजी मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत मतमोजणी केंद्रावर किंवा जवळच्या कर्तव्यावर असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याला हस्तक्षेप करू शकत नाही. सकाळी 10 वाजेपर्यंत कोणत्याही संस्थेत सामील होणे किंवा फिरणे, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, महामार्गावर, रस्त्याने किंवा कोणत्याही मार्गाने लोकांचा समूह किंवा सभा गोळा करणे, मतमोजणी केंद्रापासून 300 मीटरच्या परिघात इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यास मनाई आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. असे आदेशात म्हटले आहे.

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या अंदाज स्पर्धेत महायुतीला 140 तर मविआला 138 जागा

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे महाराष्ट्र विधानसभेच्या निकालासाठी अंदाज वर्तवा स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत मुंबईतील पत्रकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील सरासरी अंदाजानुसार भाजपाप्रणीत महायुती ही १४० जागापर्यंत मजल मारू शकते, तर मविआची झेपही १३८ जागापर्यंत पोहचू शकते असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

एकूणच या अंदाज स्पर्धेनुसार महाराष्ट्रात त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात येऊन अपक्षांची किंगमेकरची भूमिका राहील, असे चित्र आहे. राज्यात नंबर १ चा पक्ष हा भाजपा राहील आणि त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेसचा क्रमांक लागेल असा अंदाजही या स्पर्धेत वर्तवण्यात आला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक पसंती ही देवेंद्र फडणवीस यांना मिळाली असून त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर उद्धव ठाकरे तर तिसऱ्या क्रमांकावर एकनाथ शिंदेंना पसंती देण्यात आली आहे, अशी माहिती मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली.

येत्या २३ नोव्हेंबरला विधानसभेचा निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. अचूक अंदाज वर्तवणाऱ्या पत्रकारांना रोख रकमेची पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे, अशी माहिती स्पर्धा समन्वयक आत्माराम नाटेकर यांनी दिली.

**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड**
सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
नोंदणीकृत कार्यालय: २८/ ३० अनंत वाडी, भुलेश्वर, मुंबई ४००००२.
संपर्क: + ९१-२२-०१४००१, फॅक्स : + ९१-२२-०१४०३३
ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www.spvglobal.in

**कंपनीच्या समभाग धारकांनी लक्ष देण्यासाठी सूचना**
**अतिरिक्त सर्वसाधारण सभेची सूचना**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीची अतिरिक्त सर्वसाधारण सभा ("ईजीएम") २८/ ३० अनंत वाडी, भुलेश्वर, मुंबई ४००००२ येथे वसलेल्या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये बुधवार, १८ डिसेंबर २०२४ रोजी सायं. ०४.०० वा. आयोजित करण्यात येणार आहे. सभा बोलाविणारी सूचना अशा सभासदांना ज्यांनी त्यांच्या ई – मेल आयडीची नोंद डिपॉझिटरीज/ कंपनीकडे केली आहे त्यांना इलेक्ट्रॉनिकपद्धतीने पाठविण्यात आली आहे.

ईओजीएमची सूचना कंपनीचे संकेतस्थळ (www.spvglobal.in) वर उपलब्ध आहे आणि सभेच्या तारखेपर्यंतच्या सर्व कामकाजाच्या दिवसांमध्ये कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणीसाठी देखील उपलब्ध आहे. कंपनी आपल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ("ई-व्होटिंग") सभेत प्रस्तावित केलेल्या ठरावांवर मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा देत आहे. सभासद सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून त्यांचे मत देऊ शकतात ("रिमोट ई-व्होटिंग"). कंपनीने ई-मतदान सुविधा प्रदान करण्यासाठी एजन्सी म्हणून नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या सेवांचा सहभाग घेतला आहे.

रिमोट ई-वोटिंगशी संबंधित इतर गोष्टींसह युजर आयडी आयडी आणि पासवर्ड असलेले संप्रेषण सभा बोलावण्याच्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठवण्यात आली आहे. बैठकीची सूचना आणि ई-मतदानासाठी संवादाचे स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.spvglobal.in आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) https://www.evoting.nsdl.com संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

रिमोट ई-व्होटिंग रविवार, १५ डिसेंबर २०२४ (स. ०९:०० वा.) सुरु होईल आणि मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ रोजी (सायं. ०५:०० वा.) समाप्त होईल. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंग प्रणाली अकार्यक्षम करण्यात येईल. सभासदांद्वारे ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर, सभासदांना परत ते बदलता येणार नाही.

व्यक्ती ज्याचे नाव कट ऑफ दिनांक म्हणजेच बुधवार, ११ डिसेंबर २०२४ अनुसार सभासदांची नोंदवही / लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये आली आहेत ते रिमोट ई-व्होटिंग/ सभेच्या ठिकाणी ई-व्होटिंग करण्यासाठी पात्र असतील.

सभेची सूचना पाठवल्यानंतर आणि कट-ऑफ तारखेनुसार शेअर्स धारण केल्यानंतर कंपनीचा सदस्य होणारी कोणतीही व्यक्ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून इतर गोष्टींसह वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. कंपनीचे संकेतस्थळ, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या बैठकीच्या सूचनेमध्ये वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची तपशीलवार प्रक्रिया देखील प्रदान केली आहे. जर सदस्य आधीच ई-व्होटिंगसाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) मध्ये नोंदणीकृत असल्यास त्यांना रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी त्याचा सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतो. सभासदांचे मतदानाचे हक्क कट ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमधील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असतील. ज्या सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत(ने) दिले आहेत ते देखील सभेला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना त्यांचे मत(ने) पुन्हा देण्याचा अधिकार असणार नाही आणि सभेला उपस्थित राहणारे सदस्य ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही त्याचा त्यांचे मतदान सभेत करता येईल.

**बुक क्लोझर दिनांक**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ नुसार कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली २०१४ नुसार, सदस्यांची नोंदणी आणि कंपनीची भाग हस्तांतरण वही गुरुवार, १२ डिसेंबर २०२४ पासून बुधवार, १८ डिसेंबर २०२४ पर्यंत अतिरिक्त सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने बंद राहतील.

सदस्यांना विनंती आहे की शंका/तक्रारी सोडवण्यासाठी खालील संपर्क तपशील लक्षात घ्या, जर काही असेल: काही शंका असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध शेअरधारकांसाठी फ्रिक्वेटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू) आणि शेअरधारकांसाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: १८००-२२२ -९९० वर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती करणारे मेल पाठवा.

सभेच्या समाप्तीपासून अठ्ठेचाळीस तासांनंतर निकाल घोषित केले जातील. स्क्रूटिनायझरच्या अहवालासह घोषित केलेले निकाल कंपनीच्या www.spvglobal.in या वेबसाइटवर आणि निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच https://www.evoting.nsdl.com/ या वेबसाइटवर टाकले जातील आणि त्याचवेळी पुढे पाठवले जातील. बीएसई लिमिटेडकडे, जेथे कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात प्रदर्शित केले जातील.

**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेडकरीता संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे**
**सही/-**
**बालकृष्ण बिनानी**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: ००१७५०८०**


**दिनांक: २२ नोव्हेंबर २०२४**
**ठिकाण: मुंबई**

# इन्फ्लूएंझाने होणाऱ्या मृत्यूत वाढ, गतवर्षाच्या तुलनेत मृत्यूचे प्रमाण अधिक

प्रतिनिधी
■ मुंबई

डेंग्यू, हिवताप, चिकुनगुन्या या आजारांनी ग्रस्त रुग्ण वर्षभरात सातत्याने वाढताना दिसत आहेत. मात्र यंदा इन्फ्लूएंझाने मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या यंदा जवळपास दुपटीने वाढली आहे. यंदा राज्यात ५७ रुग्णांचा इन्फ्लूएंझाने मृत्यू झाला आहे.

वातावरणात होणाऱ्या बदलांनुसार संसर्गजन्य आजार वाढत असतात. साधारणपणे हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझाचे रुग्ण सापडतात. मात्र यंदा संपूर्ण वर्षभर राज्यात इन्फ्लूएंझाचे रुग्ण अधूनमधून सापडत होते. आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यामध्ये १ जानेवारी ते १८ नोव्हेंबर या कालावधीत २१ लाख ३३ हजार ६९५ संशयित रुग्ण सापडले, यापैकी दोन हजार ३२४ बाधित रुग्ण सापडले.



गतवर्षी याच कालावधीत तीन हजार इन्फ्लूएंझाचे बाधित रुग्ण सापडले होते. त्याचप्रमाणे गतवर्षी इन्फ्लूएंझामुळे ३६ रुग्णांचा मृत्यू झाला. मात्र या वर्षी ५७ रुग्णांचा इन्फ्लूएंझाने मृत्यू झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत मृत्यूच्या संख्येत जवळपास दुपटीने वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. इन्फ्लूएंझाने मृत्यू झालेल्या रुग्णांमध्ये 'एच१ एन१'ने एका रुग्णाचा, तर 'एच३ एन२'ने ५६ रुग्णांचा मृत्यू झाला. इन्फ्लूएंझाने संशयित असलेल्या जवळपास पाच हजार ७५१ रुग्णांना ओसेलटेमिवीर हे औषध देण्यात आले. तसेच 'एच१ एन१' आणि 'एच३ एन२' या इन्फ्लूएंझाने बाधित २५ रुग्णांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

***या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका***

*सतत खोकला येणे, थंडी येणे, ताप येणे ही 'एच१ एन१' आणि 'एच३ एन२'ची मुख्य लक्षणे आहेत. याशिवाय काही रुग्णांना वास न येणे, सतत थकवा जाणवणे, स्नायू दुखणे, घशामध्ये सतत खवखव होणे, सतत नाक वाहणे अशी महत्त्वाची लक्षणे असतात. अशी लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.*

***या नागरिकांना अधिक धोका***

*लहान मुले, महिला आणि वृद्ध यांना अधिक धोका असतो. त्याचबरोबर हृदय किंवा फुफ्फुसचा आजार, मधुमेह अशा सहव्याधीने त्रस्त आणि लठ्ठपणा असलेल्या व्यक्तींना इन्फ्लूएंझाचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. यांसारखी लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा, असा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.*

***काय आहे इन्फ्लूएंझा***

*'एच१ एन१' आणि 'एच३ एन२' दोन्ही इन्फ्लूएंझाचे उपप्रकार आहेत. 'एच१ एन१' सामान्यतः स्वाइन फ्लू म्हणून ओळखला जातो. हा एक संसर्गजन्य आजार आहे. 'एच३ एन२' हा हाँगकाँग फ्लू या नावाने ओळखला जातो. या दोघांच्या लक्षणांमध्ये साम्य आहे.*